**ग्रामपंचायतीची ग्रामसभा व मासिक सभा**

पंचायत राज समितीची शिफारस..

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग,

परिपत्रक क्रमांक पीआरसी-१०७७/२७०३ (सीआर २७३२)/तेवीस.

मंत्रालय, मुंबई-४०००३२. दि. १२ [illegible]

**परिपत्रक :-** पंचायत राज समितीच्या सन १९७६-७७ च्या नवव्या अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१९, ६.३२, ८.१७ आणि १२.९ मध्ये ग्रामसभा व मासिक सभा नियमीतपणे न घेण्याबद्दल समितीने असमाधान व्यक्त केले आहे.

२. या संदर्भात अनुक्रमे शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्रमांक व्हीपीएम-१३७५/८५५५/२३ दिनांक १० फेब्रुवारी १९७६ व क्रमांक पीआरसी-१०७६/२४१०/तेवीस दिनांक ७ जानेवारी १९७७ कडे लक्ष वेधण्यात येत आहे. दिनांक १० फेब्रुवारी १९७६ च्या परिपत्रकात असे स्पष्टीकरण करण्यात आले आहे की, मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ७ पोट कलम (१) व मुंबई ग्रामपंचायत ( ग्राम सभेच्या बैठकी) नियम १९५९ चे नियम ३, पोट कलम (१) अन्वये सरपंच किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपसरपंच यांचेवर कमीत कमी दोन ग्राम सभेच्या बैठकी घ्यावयाची कायदेशीर जबाबदारी आहे. त्यात असेही नमूद करण्यात आले आहे की, दोन ग्रामसभेच्या बैठकी घेण्यात कसूर केली तर ती व्यक्ती सरपंच/उपसरपंच म्हणून काम करण्यास अनर्ह ठरते. तसेंच दिनांक ७ जानेवारी १९७७ च्या परिपत्रकात सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना असे आदेश देण्यांत आले आहेत कीं, त्यांनी ग्रामसभा व मासिक सभा हया नियमितपणे ~~घेतल्या जातील~~ घेण्यांत येतील याची दक्षता घ्यावी व कसूर करणाऱ्या सरपंच/ग्रामसेवक यांचेविरुध्द कडक कारवाई करण्यांत यावी. असे आदेश असताना सुध्दां संबंधित अधिकाऱ्यांच्या उदासिन वृत्तीमुळें ग्रामसभा व मासिक सभा नियमितपणे घेण्यात येत नाहीत असे दिसून येते.

३. मुंबई ग्रामपंचायतीचे अधिनियम १९५८ चे कलम ७ पोट कलम (१) व मुंबई ग्राम पंचायत (ग्रामसभेच्या बैठकी) नियम १९५९ चे नियम ३ पोट नियम (१) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षातील ग्रामसभेची पहिली सभाही, त्या वर्षाच्या सुरवातीनंतर दोन महिन्याच्या आंत भरविण्यात आली पाहिजे आणि दुसरी सभाही प्रत्येक वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यात भरविण्यात आली पाहिजे. तसेंच उपरोक्त नियमाचे पोटकलम (२) अन्वये आपणी दोन बैठकी पहिली ऑगस्ट महिन्यामध्ये व दुसरी २६ जानेवारी रोजी घेतल्या पाहिजे. या प्रमाणे नमूद केलेल्या अवधीत ग्रामसभेच्या बैठकी घेणे सरपंचास त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंचास व ग्रामपंचायतीच्या सचिवास आवश्यक आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ७ मध्ये नमूद केलेल्या दोन ग्रामसभापैकी कोणतीही एक ग्राम सभा भरविण्यांस चुकला तर तो सरपंच/उपसरपंच म्हणून चालू रहाण्यास किंवा पंचायतीच्या सदस्यांच्या उरलेल्या पदावधीसाठी निवडला जाण्यास अनर्ह ठरेल तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५७ चे कलम ३६ अन्वये जर सरपंच/ उपसरपंच, पुरेशा कारणाशिवाय, कोणत्याही वित्तीय वर्षात पंचायतीच्या सभा बोलविण्यास चुकेल तर तो सरपंच/उपसरपंच म्हणून चालू रहाण्यास किंवा पंचायतीच्या सदस्याच्या पदाच्या उरलेल्या कालावधीसाठी सरपंच किंवा उपसरपंच म्हणून निवडला जाण्यास अपात्र ठरेल, अशी कायदेशीर तरतूद असूनसुध्दा व वेळोवेळी याबद्दल आदेश दिले असतांनासुध्दां सरपंच व ग्राम पंचायत सचिव यांच्या निरूत्साही वृत्तीमुळें या बैठकी

( कृ. मा. पहा).

OFFICE OF THE COLLECTOR

नियमीतपणे घेण्यात येत नाहीत हे पाहून शासनास खेद वाटतो. जिल्हा परिषदांच्या सर्व मुख्य-कार्यकारी अधिकाऱ्यांना शासन असे आदेश देत आहे कीं, त्यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समितीचे सभासद, गट विकास अधिकारी यांना ग्रामसभेच्या व मासिक सभेच्या बैठकी वेळोवेळी व नियमाप्रमाणे घेण्यात येतात या बाबतीत दक्षता घेण्याबद्दल भाग पाडावे याबद्दल तपासणी करणारे अधिकारी किंवा सरपंच/ग्रामसेवक यांच्याकडून या बाबतीत लोप किंवा उदासिनता झाली तर त्याची गंभीर दखल घेऊन अशा व्यक्तीविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी. जिल्हा परिषदांच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अशी विनंती करण्यांत येते कीं, त्यांनी गट विकास अधिकाऱ्यांना शक्य तितक्या ग्रामसभेच्या व मासिक सभेच्या बैठकीस हजर राहून मार्गदर्शन करण्याबद्दल सूचना द्याव्यात.

४. जिल्हा परिषदेच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अशी विनंती करण्यांत येते कीं, त्यांना गट विकास अधिकाऱ्यांना अशा सूचना द्याव्यात कीं, त्यांनी ग्रामपंचायत सचिवांच्या मासिक सभेत, ग्रामसभेच्या बैठकीसाठी जास्तीत जास्त लोक हजर रहाण्यासाठी कोणत्या रितीने मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी द्यावी व याबद्दल कोणती उपाय योजना अंमलात आणण्यांत यावी याबद्दल त्यांनी योग्य निर्णय घ्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सही)

( भि. बी. जोशी )

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,

जिल्हा परिषदांचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.

सर्व जिल्हाधिकारी.

पंचायत समितीचे गट विकास अधिकारी.

कार्यासन क्रमांक २९ ग्राम विकास विभाग.

कार्यासन क्रमांक २३ निवडक नस्तीसाठी.

क. जा. क्र. ... २८/६८
जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी २९-८-६८

ब-हाणपूरकर/
अ दो -----